# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २१/०३/२०२३ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२८४** **विषय क्रमांक – २८४**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.२८४ दिनांक - २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था.उ/कावि/१३०/२०२३ दि.१३/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती कडील ठराव क्र.१३७० दि.१४/३/२०२३ अन्वये, तळवडे गायरान मधील आरक्षण क्र.१/५२ व १/५३ (गट.क्र.१ ब) मध्ये डीअर पार्कचे आरक्षण बदलून डी पी मध्ये डीअर पार्क ऐवजी बायोडायर्व्हसिटी पार्कचे आरक्षण करणेबाबत. |
| **ठराव क्र.२८४ दिनांक - २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था.उ/कावि/१३०/२०२३ दि.१३/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती कडील ठराव क्र.१३७० दि.१४/३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे तळवडे येथे आरक्षण क्र.१/५२ व १/५३ (गट क्र.१ ब) येथे डीअर पार्कचे आरक्षण आहे. प्रस्तुत वनपरिक्षेत्र अधिकारीकडून सदर ठिकाणी डीअर पार्क विकसित करणे बाबत अभिप्राय मागविण्यात आला आहे. सदर अभिप्रायनुसार हरित उद्यान या सार्वजनिक सुविधेकरिता आरक्षित झालेल्या (गटक्र.१,आ.क्र.१/५२) येथील गायरान जागेलगत औद्योगिक परिसर असल्याने सदर जागे जवळ वाढत्या शहरीकरण होत आहे व भविष्यात मानवी हस्तक्षेप होण्याची दाट शक्यता आहे. हरिण या वन्य प्राण्यांकरिता पोषक असे मोकळा गवताळ प्रदेशाची आवश्यकता असून सध्या उपलब्ध क्षेत्रातील झाडांची जैवविविधता व घनता पाहता येथे हरिण वर्गीय प्राणी अधिवास कृत्रिमरित्या तयार करणे उचित होणार नाही असा अभिप्राय वन परिक्षेत्र अधिकारी, भांबूर्डी यांनी महापालिकेस कळविले आहे. दि.११/१२/२०२२ रोजी मा.आयुक्त सो यांचे समवेत सदर ठिकाणी स्थळ पाहणी करण्यात आली. सदर स्थळ पाहणी दरम्यान वन परीक्षेत्र अधिकारी यांचा अभिप्रायचा विचारात घेता प्रस्तुत ठिकाणी डीअर पार्क ऐवजी बायोडायर्व्हसिटी पार्क करणेबाबत मा.आयुक्त यांनी सूचना दिलेल्या आहेत. सबब सदर ठिकाणी डीअर पार्कचे आरक्षण बदलून डी पी मध्ये डीअर पार्क ऐवजी बायोडायर्व्हसिटी पार्कचे आरक्षण करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास** |

| | |
|---|---|
| | **मा.प्र्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२८५** **विषय क्रमांक – २८५**
**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२८५ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्राथ/शिक्षण/आस्था/१अ/६०/२०२३ दि.१३/३/२०२३ अन्वये, प्राथमिक शिक्षण विभागातील उपप्रशासन अधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी व पर्यवेक्षक यांचे कर्तव्ये, जबाबदारी व अधिकार निश्चितीबाबत. |
| **ठराव क्र. २८५ दिनांक- २१/०३/२०२३३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्राथ/शिक्षण/आस्था/१अ/६०/२०२३ दि.१३/३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभाग कार्यरत आहे. शिक्षण विभागाचे नियंत्रणाखाली मनपाचे 105 शाळा व मनपा संचालित 05 शाळा तसेच मनपा हद्दीतील खाजगी 539 शाळेवर नियंत्रण करावे लागते. मनपाकडे कार्यरत असलेले अपुरी कर्मचारी संख्या व मनपाचे भौगोलिक क्षेत्र विचारात घेता शिक्षण विभागातील सहा.प्रशासन अधिकारी व पर्यवेक्षक पदामध्ये वाढ करुन व शैक्षणिक कामकाजावर नियंत्रण ठेवणेकामी व कामकाज जलद गतीने होणेचे दृष्टीने उप प्रशासन अधिकारी हे पद नव्याने निर्मीती करुन शासनाकडे आकृतीबंध मंजूरी कामी पाठवणे आवश्यक आहे.त्यास मा.महापालिके सभेने ठराव क्रमांक 770 दिनांक 29/01/2022 अन्वये मान्यता दिलेली आहे. शासनाकडे मंजूरी कामी पाठविणेकरीता सदर पदांचे कर्तव्ये, जबाबदारी व अधिकार निश्चिती करणे आवश्यक आहे. सदरची बाब धोरणात्मक असल्याने यांस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२८६** **विषय क्रमांक – २८६**
**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२८६ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/०६/कावि/२९६/२०२३ दि.१३/०३/२०२३ अन्वये, म.न.पा.चे स्वामी विवेकानंद क्रीडांगण, बॅडमिंटन हॉल तळमजला कृष्णानगर चिंचवड पुणे ४११०१९ येथे "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय रायफल व पिस्तुल नेमबाजी प्रशिक्षण केंद्र" विकसित करून ते अरुण पाडुळे स्पोर्ट्स प्रमोशन फाउंडेशन, चिंचवड पुणे ४११०१९ यांना १० वर्षाकरिता प्रशिक्षणाकरिता कराराने चालविण्यास देणेबाबत. |
| **ठराव क्र. २८६ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/०६/कावि/२९६/२०२३ दि.१३/०३/२०२३ अन्वये, म.न.पा.चे स्वामी विवेकानंद क्रीडांगण, बॅडमिंटन हॉल तळमजला कृष्णानगर चिंचवड पुणे ४११०१९ येथे "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय रायफल व पिस्तुल नेमबाजी प्रशिक्षण केंद्र" विकसित करून सदर पिंपरी चिंचवड राष्ट्रीय रायफल व पिस्तुल नेमबाजी प्रशिक्षण केंद्र" अरुण पाडुळे स्पोर्ट्स प्रमोशन फाउंडेशन, चिंचवड १९ यांनी, त्यांना म.न.पा.ने ठरवून दिलेली फी आकारून एकूण प्रशिक्षणार्थी संखेच्या ६० टक्के मुलांना त्यांना प्रशिक्षण देणेची मुभा राहील व एकूण प्रशिक्षणार्थी संखेच्या ४० टक्के मुले म.न.पा. शाळेतील संबंधित क्रीडा शिक्षक यांचेशी समन्वय साधून रायफल व पिस्तुल नेमबाजी खेळासाठी पात्र विद्यार्थ्यांची निवड करून १४, १७, १९ वर्षाखालील मुलांना मोफत प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील, या अटीवर १० वर्षाकरिता कराराने चालविण्यास देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२८७** **विषय क्रमांक – २८७**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२८७ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/३३/२०२३ दि.१३/०३/२०२३ अन्वये, मौजे वढू बुद्रुक ता.शिरूर जि.पुणे येथील धर्मवीर छत्रपती श्री.संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी कार्यक्रमासाठी आर्थिक सहाय्य अदा करणेबाबत. |
| **ठराव क्र. २८७ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/३३/२०२३ दि.१३/०३/२०२३ अन्वये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण- ९ नगरपालिका निधी व अन्य निधी, नगरपालिका निधी यामध्ये कलम ८९ चे अधीन राहून, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, वढू बुद्रुक यांना श्री.छत्रपती संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी कार्यक्रमास समाधी ठिकाणी वढू बुद्रुक येथे मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था पिण्याचे पाणी, हारफुले इ.करिता, करारनामा करून, सदरचे आर्थिक सहाय्य र.रु.२,९९,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्याान्नव हजार फक्त) हे माहिती व जनसंपर्क विभाग यांच्या **"राष्ट्र पुरुष /महा पुरुषांच्या विचारांचा प्रचार करणे (प्रबोधनात्मक उपक्रम)"** या लेखाशिर्षावरकेलेल्या तरतूदी मधूनखर्ची टाकणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.- २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२८८** **विषय क्रमांक – २८८**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२८८**<br>**दिनांक-२१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. स्था/प्रकल्प/२६६/२०२३ दि.१६/३/२०२३ अन्वये मौजे हिंजवडी येथील शिवाजी चौक ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर पर्यंतचा रस्ता दुरुस्ती व मजबुतीकरण करणे बाबत. |
| **ठराव क्र. २८८**<br>**दिनांक-२१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. स्था/प्रकल्प/२६६/२०२३ दि.१६/३/२०२३ अन्वये, मनपाचे मौजे हिंजवडी ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजी चौक ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर पर्यंतचा रस्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत विकसित करणेत येतो.सदर रस्त्याची रुंदी १२.०० मी.असून हा रस्ता हिंजवडी आय.टी.पार्क व वाकडकडे जाणारा मुख्य रस्ता असल्याने वाहनांची वर्दळ/वाहतूक मोठ्या प्रमाणत होत असते.सदर रस्त्यातील खड्ड्यांमुळे तेथील वाहतूक प्रभावित होत असून खड्ड्यांमुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे.मौजे हिंजवडी येथील शिवाजी चौक ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर पर्यंतचा रस्ता दुरुस्ती करण्याबाबत हिंजवडी ग्रामपंचायतीची मागणी तसेच नागरिकांच्या सदर रस्त्यातील खड्ड्यांबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे दि.०३/०२/२०२३ रोजी उप अभियंता, प्रकल्प विभाग व कनिष्ठ अभियंता, प्रकल्प विभाग यांचेकडून पाहणी करण्यात आलेली आहे. बीआरटीएस प्रकल्प विभागामार्फत नाशिक फाटा ते वाकड ४५.०० मी बीआरटीएस रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाची निविदा काढण्यात आलेली आहे. सदर काम (निविदा क्र.- ६३/०२/२०१९-२०) ठेकेदार मे. साईप्रभा कंस्ट्रक्शन यांना मिळालेले असून कामाचे आदेश दि.२२/४/२०२१ रोजी देण्यात आलेले आहे. सदर कामास दि.३१/०३/२०२३ पर्यंत मुदतवाढ देणेत आली असून सदर कामामधून मौजे हिंजवडी येथील छत्रपती शिवाजी चौक ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर पर्यंतचा (महानगरपालिका हद्दीपर्यंतचा) रस्ता दुरुस्ती, डांबरीकरण व त्या अनुषांगिक कामे करता येणे शक्य आहे. तथापि सदरचे काम महानगरपालिका हद्दीबाहेर करावयाचे असून त्याकरीता स्थळबदल करणे आवश्यक आहे. वरील कामाची निकड व वारंवार होणा-या मागणीचा विचार करता सद्यस्थितीत प्रकल्प विभागाचे निविदा क्र.- ६३/०२/२०१९-२० (निविदा दर- ३२.५२ %कमी) चे कामातून विषयांकित काम करता येणे शक्य असून करणेस हरकत वाटत नाही. त्यामुळे सदर कामासाठी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२८९** **विषय क्रमांक – २८९**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२८९ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. लेखा/३१/कावि/४२/२०२३ दिनांक ०६/०३/२०२३ अन्वये पीएमपीएमएल संस्थेस सन २०२२-२३ या वर्षातील अंदाजित संचलन तूटीपोटी अग्रिम स्वरुपात रक्कम अदा करणेबाबत. |
| **ठराव क्र. २८९ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. लेखा/३१/कावि/४२/२०२३ दिनांक ०६/०३/२०२३ अन्वये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचेकडील पत्र जा.क्र.पी.एम.पी. एम.एल /मु.ले.वि.अ./५१८०,दि.२०/०२/२०२३ नुसार सन २०२१-२२ च्या एकूण संचलनतूट र.रु.७१८.९७ कोटी पैकी ४०% स्वामित्व हिस्स्यानुसार र.रु.२८७.५९ कोटी पैकी र.रु.२६६ कोटी प्राप्त झाले असून उर्वरित येणे बाकी र.रु.२१.५९ कोटी व सन २०२२-२३ या वर्षातील अंदाजित संचलनतूटीपोटी अग्रिम र.रु.२८ कोटी मिळणेस विनंती केली आहे. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचेकडील पत्र क्रं.पीएमपीएमएल/मुलेविअ/ ३६१७,दिनांक १४/१२/२०२१ नुसार पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर सन २०२२-२३ साठी एकूण तरतूद र.रु.२१९.३८कोटी करणेत आली असून यामध्ये संचलनतूट २०१.३८ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.१० कोटी वर्ग ३ व ४ च्या वेतन प्रतिपूर्ती करिता र.रु.८ कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे.आजअखेर एकूण खर्च र.रु.२१८.३८ कोटी झाला असून, मा.महापालिका सभा ठराव क्र.२१५दि.०६/१२/२०२२ नुसार र.रु.७.०० कोटी तरतूद वर्ग करणेत आली आहे. तसेच यापूर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र.१०५५९, दि.२७/१०/२०२१ च्या मान्यतेनुसार र.रु.४३,००,००,०००/- सन २०२१-२२ मधील संचलनतूटीपोटी अग्रिम स्वरुपात देणेत आलेले आहेत. या लेखाशिर्षावर स्मार्ट सिटी लेखाशिर्ष र.रु.७ कोटी व अमृत सिवरेज निधी लेखाशिर्ष वरून र.रु.२४ कोटी वर्ग करणेत आलेले आहेत. असे एकूण र.रु.२४९.२९कोटी आज अखेर खर्च झाला आहे. वाचले क्र. ३ च्या मागणीनुसार पीएमपीएमएल संस्थेस सन २०२२-२३ या वर्षातील अंदाजित संचलनतूटीपोटी अग्रिम स्वरुपात र.रु.३६,००,००,०००/- (अक्षरी र.रु.छत्तीस कोटी फक्त) अदा करणेकरिता, पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर तरतूद शिल्लक नसून (उणे) शिल्लकेवर तरतूद खर्ची करून रक्कम वर्ग करणेस मा.स्थायी समिती सभेच्या उमेद मान्यतेवर अदा करणे आवश्यक आहे. शासन निर्णयानुसार सन २०२१-२२ च्या संचलनतूटीचे महानगरपालिकेतील मुख्यलेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षण करुन अंतिम संचलनतूट निश्चित करून अहवाल देण्याची जबाबदारी पीएमपीएमएल व्यवस्थापनाची राहील याबाबत माहे मार्च २३ पर्यंत कार्यवाही पूर्ण करून अहवाल दयावा.सन २०२१-२२ च्या अंदाजित संचलनतूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत अदा करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९०** **विषय क्रमांक – २९०**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२९०**<br>**दिनांक-**<br>**२१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मुका/वि/०६/कावि/१६/२०२३ दिनांक १६/०३/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारणी करणेबाबत. |
| **ठराव क्र. २९०**<br>**दिनांक-**<br>**२१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मुका/वि/०६/कावि/१६/२०२३ दिनांक १६/०३/२०२३ अन्वये, महाराष्ट्र शासनाच्या “माझी वसुंधरा” धोरणाअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर अपारंपारिक उर्जेच्या निर्मितीसाठी नाविन्यपुर्ण उपक्रमास चालना मिळणेकरीता विविध उपाययोजना राबविणे तसेच नुतनीकरणक्षम उर्जा निर्मितीचे लक्ष्य साध्य करणेकरीता नवीन आणि अक्षय उर्जा मंत्रालयाच्या विविध कार्यक्रमांच्या/धोरणांच्या उपलब्धतेवर आधारित नविकरणीय उर्जा प्रकल्प विकसित करणे व ईव्ही चार्जिंग यंत्रणा उभारणी करणे विचाराधिन आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना Electrical Vehicle Charging ची सुविधा उपलब्ध करुन देणे कामी एकुण 22 ठिकाणी BOO (Build, operate & Own Model) वर EV Charging Facility वाजवी दराने मनपामार्फत उपलब्ध करुन देणेचे नियोजन आहे. मनपा मार्फत 22 ठिकाणांकरीता एकच निविदा काढणेत येणार आहे. सदर एजन्सी यांना फक्त जागा नाममात्र भाडेतत्वावर मनपा कडुन उपलब्ध करुन देणेत येईल व 08 वर्षाकरीता एजन्सी मार्फत स्वखर्चाने मराविविकं यांचेकडुन वीज पुरवठा घेणे व Ev Charging Station उभारणी करणे तसेच त्या 08 वर्षाकरीता चालन व देखभाल करणे आवश्यक राहील.सदर एजन्सीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रती युनिट (Per KWh) Agreed Revenue Sharing ESCROW अकाउंट चे माध्यमातुन देणे आवश्यक आहे.व अधिकतम Revenue Sharing देणारे एजन्सी यांना लघुत्तम निविदाधारक म्हणुन कामाचे आदेश देणेचे नियोजन आहे. तसेच सदर ईव्ही चार्जिंग स्टेशन्स करीता संबंधित एजन्सीमार्फत ग्राहकांना आकारण्यात येणारा दर भविष्यामध्ये महाराष्ट्र वीज वितरण कंपनी यांचेमार्फत ईव्ही चार्जिंग स्टेशन्स करीता आकारण्यात येणारा वीजदर कमी/ जास्त झाल्यास प्रत्यक्ष कमी/ जास्त झालेल्या वीज दरानुसार मा. आयुक्त, पिचिंमनपा यांचे पुर्व मान्यतेने ग्राहकांना प्रत्यक्ष आकारण्यात येणारा दर त्यानुसार कमी/जास्त करणेस संबंधित एजन्सीस बंधनकारक असणार आहे. सल्लागारामार्फत देणेत आलेल्या Techno commercial Feasibility Report नुसार एजन्सीमार्फत प्रत्येकी ईव्ही चार्जिंग स्टेशन करीता अंदाजे र रु. 69,00,000/ इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च एजन्सी स्वत: करणार आहे. मनपास याकरीता कोणत्याही प्रकारचा खर्च करावयास लागणार नाही.तसेच सदर प्रकल्पाविषयी करारनामा करणे, निविदा अटी शर्ती निश्चिती करणे याबाबतचे अधिकार मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे मान्यतेने असतील. |

<table>
<tr>
<td></td>
<td>सदर प्रकल्पाकरीता एकुण 22 ठिकाणे X रक्कम रु. 6900000= 151800000+जीएसटी= अंदाजे वीस कोटी(रक्कम रु. वीस कोटी) इतका खर्च अपेक्षित आहे.सदर प्रकल्प नागरिकांकरीता वाजवी दराने EV Charging सुविधा उपलब्ध करुन देणेच्या उद्देशाने केला जात आहे.सदर कामासाठी सन 2022-23 आर्थिक वर्षात अंदाजपत्रकीय पुस्तकात नावाचा समावेश करणे आवश्यक आहे. सबब सदर कामासाठी आवश्यक एकुण रक्कम रु. 20 कोटी खर्चास "सार्वजनिक खाजगी भागीदारी"या लेखाशिर्षा अंतर्गत प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव</th><th>लेखाशिर्ष नांव</th><th>अंदाजपत्रक पानांक व अ.क्र.</th><th>बजेट कोड</th><th>अंदाजपत्रकीय रक्कम</th></tr>
<tr><td>1.</td><td>पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारणी करणे (BOO)</td><td>सार्वजनिक खाजगी भागीदारी</td><td></td><td>नव्याने समावेश सन 2022-23</td><td>२००००००००</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>निर्णय</td>
<td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td>
</tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९१** **विषय क्रमांक – २९१**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक- २९१ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. अक्षे/स्था/कावि/०६/२३/२०२३ दिनांक १७/०३/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एस. के. एफ. कंपनी समोर वाहतुक बेट, देखभाल सुशोभिकरण व त्याबदल्यात जाहिरात करणे या कामासाठी खाजगी संस्थांची नेमणुक करणेबाबत. |
| **ठराव क्र. २९१ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. अक्षे/स्था/कावि/०६/२३/२०२३ दिनांक १७/०३/२०२३ अन्वये, मौजे चिंचवड येथील चापेकर चौक ते खंडोबा माळ चौक या विकास आराखड्यातील ३१.०० मी रस्त्यात एस. के. एफ. कंपनी समोर वाहतुक बेट तयार करून वाहतुक बेटांचे सुशोभिकरण करणेकामी उपाध्यक्ष (HR), मे. एस. के. एफ. कंपनी त्यांचेकडील पत्रान्वये त्यांचे खर्चात काम करणेस मान्यता देणेची विनंती केली आहे. एस. के. एफ. कंपनीस १०० वर्ष झालेच्या निमित्ताने एस. के. एफ. कंपनीचे परिक्षेत्रात सुशोभिकरण करणेचे कंपनीचे नियोजन आहे. संबंधित संस्थेला या बाबत खालीलप्रमाणे असलेल्या अटी / शर्ती नुसार काम करणेस मान्यता देणे आवश्यक आहे.<br><br>१. संबंधित संस्थेस वरील नमूद ठिकाणी दिलेले सुशोभिकरण व त्याची १० वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करावयाची आहे. तसेच मनपाने मान्य केलेल्या आराखड्याप्रमाणे संस्थेस काम करणे बंधनकारक आहे.<br><br>२. त्यासाठीची मुदत ही त्यांना दिलेल्या आदेशाच्या दिनांकापासून पुढील १० वर्ष कालावधीसाठी राहील. सदर सुशोभिकरण व त्यासाठी १० वर्ष देखभालीचा खर्च संबंधित संस्थेने करावयाचा आहे. काम समाधानकारक असल्यास मागणी केल्यानंतर तत्कालीन मनपा धोरणानुसार मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेण्यात येईल.<br><br>३. सदर वाहतुक बेट सुशोभिकरणात मनपाने ठरवून दिल्याप्रमाणे वाहतुकीस अडथळा ठरणार नाही अशा प्रकारे जाहिरात करता येईल यापेक्षा अतिरिक्त जाहिरात करता येणार नाही.<br><br>४. सदरचे सुशोभिकरणाचे जाहिरात संबंधित संस्थेस स्वताच्या नावाने जाहिरात करता येईल. जाहिरात हक्क इतर संस्थेस विकता येणार नाही अथवा इतर संस्थेची जाहिरात लावता येणार नाही. तसे आढळल्यास करारनामा रद्द करणेत येवून काम काढून घेणेत येईल.<br><br>५. सुशोभिकरणास आवश्यक वीज, पाणी इ. संबंधित संस्थेस स्वखर्चाने करावा लागेल. तसेच, जाहिरातीकरिता आवश्यक वीज संबंधित संस्थेस स्वखर्चाने करावा लागेल. तसेच, सदर ठिकाणी संस्थेला स्वखर्चाने दैनंदिन सफाई करावी लागेल.<br><br>६. सदर जाहिरात सुशोभिकरणाचे ठिकाणी मनपाने मान्य केलेल्या जागेवर लावणेत |

| | |
|---|---|
| | येईल.<br><br>७. सदरचे काम असमाधानकारक आढळलेस सदरचा करारनामा व काम मुदती पूर्व रद्द करणेचा अधिकार मा.आयुक्त, पिं.चिं.मनपा यांना राहिल.<br><br>८. संबंधित संस्थेस कामाचा आदेश दिल्यानंतर सुशोभिकरणाचे काम १ महिन्याच्या मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे.<br><br>वरील प्रमाणे विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९२** **विषय क्रमांक – २९२**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२९२ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/१२/३१/२०२३, दि.१३/०३/२०२३ अन्वये क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे याकरीता र.रू. ३० कोटी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. २९२ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. .क्र.बक्षे/स्था/कावि/१२/३१/२०२३, दि.१३/०३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र १८ मधील चिंचवडगाव येथे क्रांतिवीर चापेकर बंधुंचा जुनावाडा ही पुरातन ऐतिहासीक वास्तु होती. सदर वाडा हा मोडकळीस आल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामधील चिंचवड येथील क्रांतिवीर चापेकर बंधूचे स्मारक उभारणेकरीता मा. दत्ताजी साळवी, सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना विनंती करून असे स्मारक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उभारावे असे सुचविले. मा. मुख्यमंत्री महोदयांनी त्यांची विनंती मान्य केली. त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिवांनी त्यांचे **पत्र क्र. मुमंस / फाईल / कक्ष / १५ / ५७८ दि.१२/०६/१९९७**अन्वये सदरचे क्रांतिवीर चापेकर बंधूचे स्मारक उभारणे बाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विचार करून यथोचित स्मारक उभारणेचा विचार करावा असे निर्देश दिले होते.<br>याबाबत मनपाचे **कायदा सल्लागार यांचे कडील पत्र क्र. कास/२/कावि/८२५/२००२ दि.१८/११/२००२**रोजीचे अभिप्राय नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम क्र. ६६ चे पोटनियम २२ व २५ अन्वये महानगरपालिकेस सार्वजनिक कल्याणासाठी व ग्रंथालये, संग्रहालये कलादालने इत्यादी निर्माण करणेसाठी किंवा बांधकाम करणेसाठी रक्कम खर्च करता येईल असे स्पष्ट पणे नमुद केले आहे. तसेच महानगरपालिका व क्रांतिवीर चापेकर समिती यांचे मध्ये झालेल्या कराराप्रमाणे व कराराचे मान्य असलेल्या मसुद्या प्रमाणे सदरील स्मारक हे सर्व नागरींकांसाठी खुले रहाणार असुन त्याचे स्वरूप महानगरपालिके मध्ये निहित असलेले स्मारक असे राहाणार आहे. त्यामुळे त्याची देखभाल कर्तव्य **(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ६३(८) प्रमाणे)** महानगरपालिकेवर आहे. सबब त्याही कारणास्तव **महानगरपालिकेस क्रातिवीर चापेकर स्मारक या प्रकल्पास मंजूर केलेल्या तरतूदी प्रमाणे खर्च करता येईल. त्यासाठी शासनाचे मान्यता घेणेची आवश्यकता नाही. तथापि वेळोवेळी करणेत येणा-या खर्चास मंजूरी घेणे व तसा प्रस्ताव नियमाप्रमाणे मा. स्थायी समिती सभा व मा. महापालिका सभा यांचे कडून घेणे हे कायदेशिर दृष्ट्या उचित होईल असा अभिप्राय दिलेला आहे.**<br>क्रां.चापेकर स्मारकाचे तिस-या टप्प्यातील उर्वरीत कामांकरिता बहुउद्देशिय सभागृह, प्रदर्शना करीता हॉल, ऐतिहासीक वस्तुंचे संग्रहालया करीता हॉल, कॉन्फरन्स हॉल, जिमनॅशियम हॉल इत्यादींचे नियोजन व बांधकामाचे नकाशे, आवश्यक मंजुरी कामे करणेसाठी आर्किटेक्ट म्हणुन श्री किरण कलमदानी यांची सदर प्रकल्पासाठी नेमणुक |

करणेत आली. नियोजनानुसार स्मारकाची तिस-या टप्प्यातील कामे करणेसाठी दि. ३०/११/२०१६ रोजी सुधारीत बांधकाम परवानगी घेणेत आली होती. त्यानुसार तिस-या टप्प्यातील पहिल्या भागातील इमारतीचे काम पुर्ण करणे कामी निविदा क्र १०२/१/२०१७-१८ अन्वये र.रू. ४८,९६,००९/- इतक्या रकमेची निविदा काढणेत आली होती. त्यानुसार निविदे मध्ये प्रस्तावित काम हे मुळ वाड्याचे मोकळ्या जागेमध्ये प्रस्तावित होते, परंतु स्मारक समितीस सदरचे काम मुळ वाड्या शेजारील श्री. रबडे यांचे मालकीची जागेमध्ये देखील करावयाचे होते. त्यानुषंगाने आर.सी.सी चे काम करणेबाबतचे नियोजन करून त्यानूसार सुधारीत नकाशे तयार करून काम करणेत आले यामध्ये फक्त वाड्याच्या मागील मोकळ्या जागेत आर.सी.सी फाऊंडेशनचे काम करता आले.त्यानंतर सुधारित नकाशानुसार इमारतीचे आर.सी.सी.व बांधकाम प्लास्टर विषयक कामांची निविदा र.रू.३,७०,७८,५१०/- काढून कामाचे आदेश देण्यात आलेले होते.तथापि क्रांतिवीर चापेकर स्मारकाच्या तिसऱ्या टप्प्यातील भाग दोन मधील इमारतीच्या कामाचे चापेकर स्मारक समितीमार्फत सुधारित नकाशामध्ये बदल केलेमुळे तसेच वाड्यातील कामातील बदलामुळे निविदा रद्द करण्यात आली आहे.

सदर कामाबाबत मा. आयुक्त सो. व मा. खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या समवेत दि.०९/०३/२०२३ रोजी मा.आयुक्त कक्षात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस क्रां.चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी व मनपा अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या तिस-या टप्प्याची उर्वरित कामे (बहुउद्देशिय सभागृह, प्रदर्शना करीता हॉल, ऐतिहासीक वस्तुंचे संग्रहालया करीता हॉल, कॉन्फरन्स हॉल, जिमनॅशियम हॉल इत्यादी) करणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार आवश्यक सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रू. ३० कोटी रक्कमेस मा.महापालिका सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी घेण्याचे निश्चित करण्यात आले.

| अ. क्र. | कामाचा नाव | सुधारित प्रशासकीय मान्यता र. रु. | कामाचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्पाची कामे करणे (भाग-२) | १२,५८,००,०००/- | मंजुर बांधकाम नकाशानुसार इमारतीचे आर.सी.सी बांधकाम प्लास्टर व इतर अनुषंगिक कामे करणे. | अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. |
| २. | क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्पाची कामे करणे (भाग-३) | ७,२६,००,०००/- | स्मारकांचे तयार होणा-या इमारतीमध्ये अंतर्गत सजावट करणेसाठी म्युरल्स, ऐतिहासिक काळातील भांडी,लाकडी कपाटे,धातूशिल्प इ.कामे करणे | क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीमार्फत काम चालू आहे. |
| ३. | क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्पाची कामे करणे (भाग-३) | २,५६,००,०००/- | स्मारकांचे तयार होणा-या इमारतीमध्ये विविध क्रांतिकारकांचे एकूण ४७ पुतळे तयार करणे. | क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीमार्फत काम चालू आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्पाची कामे करणे (भाग-४ ) | ७,६०,००,०००/- | स्मारकांचे इमारतीमध्ये ऐतिहासिक काळातील लाकडीकाम, दगडीकाम व अंतर्गत सुशोभिकरणाची कामे करणे | क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती मार्फत निविदा कार्यवाही करून सदरचे काम करण्यात येणार आहे. |
| | एकूण | ३०,००,००,०००/- | | |

उपरोक्त प्रमाणे क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिसऱ्या टप्प्यातील कामाकरीता एकूण र.रू.३०.०० कोटी रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९३** **विषय क्रमांक – २९३**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२९३ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/०७/कावि/७३/२०२३ दि.२०/०३/२०२३ अन्वये पिं. चि. मनपाच्या आस्थापनेवरील अभियांत्रिकी विभागाच्या आकृतीबंधामध्ये शहर अभियंता (मुख्य अभियंता समकक्ष) - १, मुख्य अभियंता-२नव्याने निर्माण करणेबाबत व अतिरिक्त आयुक्त अभिनामाच्या पदांच्या निकषांमध्ये बदल करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. २९३ दिनांक- २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/०७/कावि/७३/२०२३ दि.२०/०३/२०२३ अन्वये मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ७००, दि.२०/९/२०२१ हा सदस्य पारित ठराव असून, त्यामध्ये शहर अभियंता (मुख्य अभियंता समकक्ष) - १, मुख्य अभियंता-२ या पदांची पदनिर्मिती करणेस मान्यता दिलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध पदांच्या आकृतीबंधास महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने मान्यता दिलेली आहे.पिंपरी चिंचवड मनपाचा समावेश ब वर्ग महापालिकेत झाला असून,शासनाच्या नगरविकास विभागाने पुणे मनपाच्या धर्तीवर आकृतीबंध तयार करण्याबाबत सूचविले आहे.त्यानुसार सुधारीत आकृतीबंध २०२३ शासन मान्यतेकामी पाठविणेत आलेला आहे. पिंपरी चिंचवड मनपाचा वार्षिक अर्थसंकल्प सुमारे ७ हजार कोटी रुपये इतका वाढलेला असून,मनपाचे वाढते कार्यक्षेत्र झपाट्याने वाढणारी लोकसंख्या व नजीकच्या ७ गावांचा समावेश करण्याबाबत प्रस्तावित आहे.त्या योजनांची अंमलबजावणी या सर्व बाबी लक्षात घेता पुणे मनपाच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड मनपामध्ये मुख्य अभियंता पदाची वेतनश्रेणी,सार्वजनिक बांधकाम विभाग समकक्ष करण्याचा उक्त ठराव मंजुर करण्यात आलेला आहे. प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने खालीलप्रमाणे पदनिर्मीती करणेकामी प्रस्तावित करणेत येत आहे. |
| | |

| क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदाची अर्हता |
|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १ | शहर अभियंता (मुख्य अभियंता समकक्ष) | एस २७ ११८५००-२१४१०० | पदोन्नती १००%<br>१. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर अगर तत्सम अर्हता आवश्यक.<br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील सह शहर अभियंता पदावरील कामकाजाचा सलग ३ वर्ष अनुभव, अशा अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती |
| | २ | मुख्य अभियंता-१ | एस २७ ११८५००-२१४१०० | पदोन्नती १००%<br>१. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर किंवा तत्सम अर्हता/ पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील सह शहर अभियंता पदावरील कामकाजाचा सलग ३ वर्ष अनुभव, अशा अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती |
| | ३ | मुख्य अभियंता-२ | एस २७ ११८५००-२१४१०० | पदोन्नती १००%<br>१. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर किंवा तत्सम अर्हता/ पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील सह शहर अभियंता पदावरील कामकाजाचा सलग ३ वर्ष अनुभव, अशा अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती |

## प्रशासकीय विभाग

| | अक्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदाची अर्हता |
|---|---|---|---|---|
| | १ | अतिरिक्त आयुक्त (१) | प्रशासकीय सेवा-श्रेणी-१<br>प्रतिनियुक्ती<br>एस-२७<br>११८५००-२१४१०० | राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल असा अधिकारी (भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी) |
| | २ | अतिरिक्त आयुक्त (२) | प्रशासकीय सेवा-श्रेणी-१<br>प्रतिनियुक्ती<br>एस-२७<br>११८५००-२१४१०० | राज्य शासनाकडून वेळोवेळी नमणूक करण्यात येईल असा शासनाचे सह सचिव,उप सचिव दर्जाचे/मुख्य अधिकारी(निवडश्रेणी) किंवा समकक्ष वेतनश्रेणीतील अधिकारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे नियुक्त करता येईल. |
| | ३ | अतिरिक्त आयुक्त (३) | पदोन्नत्ती – १ पद<br>एस-२७<br>११८५००-२१४१०० | शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१४/प्र.क्र.२१८/नावि-१४ दि.०६/०१/२०१५,दि.०७/०१/२०१५ व दि.२५/०६/२०१५ नगर विकास विभागाच्या शासन निर्णयामध्ये निश्चित करण्यात आलेल्या अर्हतेनुसार(शासन वेळोवेळी सदर अर्हतेत बदल करेल असे बदल लागू राहतील.) |

| | |
|---|---|
| | प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेनुसार पदनिर्मीती करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९४** **विषय क्रमांक – २९४**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. २९४ दिनांक - २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र सविवि/०३/कावि/४२/२०२३ दि.२०/३/२०२३ अन्वये, महिला व बालकल्याण योजने अंतर्गत मा.अटलबिहारी वाजपेयी – विधवा / घटस्फोटीत महिलांना किरकोळ स्वरुपाचा घरगुती व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य योजनेमध्ये दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र. २९४ दिनांक - २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र सविवि/०३/कावि/४२/२०२३ दि.२०/३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत पिंपरी चिंचवड शहरातील महिला,बालके,मागासवर्गीय व्यक्ती,दिव्यांग व्यक्ती,अनाथ-निराधार व्यक्ती,कुष्ठरुग्ण, HIVबाधित रुग्ण, ज्येष्ठ नागरिक या गरजू आणि वंचित घटकांसाठी विविध प्रकारच्या लोक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. महिला व बालकल्याण योजने अंतर्गत मा.अटलबिहारी वाजपेयी– विधवा/ घटस्फोटीत महिलांना किरकोळ स्वरुपाचा घरगुती व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य देणे ही योजना कार्यरत होती. या योजने अंतर्गत अर्जदार महिलांसाठी वयाची अट नव्हती परंतू सदर योजने मध्ये मा.महापलिका सभा ठराव क्र.४९ दि.१०/०५/२०२२ अन्वये योजनेच्या अटी शर्ती मध्ये दुरूस्ती करण्यात आली व दि.३०/०५/२२ रोजीच्या प्रस्तावान्ये मान्यता देण्यात आली व या योजनेमध्ये सुधारीत बदल करणेत आलेला आहे.<br><br>सदर ठरावान्वये मा.अटलबिहारी वाजपेयी– विधवा/ घटस्फोटीत महिलांना किरकोळ स्वरुपाचा घरगुती व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य देणे या योजने मधील वयाच्या अटीत बदल करणेत आला आहे. अर्जदार महिलेचे वय अर्ज केलेल्या दिनांकास वय मर्यादा ५० वर्षा पर्यंतच असावे असे नमुद करण्यात आले आहे. या संदर्भात माजी |

महापौर, माजी नगरसेवक, महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना पिं.चिं.शहर सचिव यांनी प्रत्रान्वये सदरची अट रद्द करण्याची मागणी केली आहे.

| **अ.क्र** | **सध्याची योजना** | **सुधारीत योजना** |
|---|---|---|
| १) | **मा.अटलबिहारी वाजपेयी – विधवा / घटस्फोटीत महिलांना किरकोळ स्वरुपाचा घरगुती व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य** | **मा.अटलबिहारी वाजपेयी – विधवा / घटस्फोटीत महिलांना किरकोळ स्वरुपाचा घरगुती व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य** |
| २) | **लाभाचे स्वरुप** – पिंपरी चिंचवडमहानगरपालिके मार्फत राबविण्यात येणा-या कौशल्य प्रशिक्षण योजनेअंर्तगत प्रशिक्षण घेतले असल्यास र.रु २५,०००/- व प्रशिक्षण घेतले नसल्यास र.रु १५,०००/- टीप-(ज्यां लाभार्थीना यापुर्वी लाभ मिळाला आहे त्यांनी पुन्हा लाभ मिळणेकामी अर्ज करु नये) | **लाभाचे स्वरुप** – पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत राबविण्यात येणा-या कौशल्य प्रशिक्षण योजनेअंर्तगत प्रशिक्षण घेतले असल्यास र.रु २५,०००/- व प्रशिक्षण घेतले नसल्यास र.रु १५,०००/- टीप-(ज्या लाभार्थीना यापुर्वी लाभ मिळाला आहे त्यांनी पुन्हा लाभ मिळणेकामी अर्ज करु नये) |

| | | |
|---|---|---|
| ३) | १.अर्जदाराने अर्जासोबत पिं.चिं.मनपा हद्दीमधील आधारकार्ड जोडणे अवश्यक.<br><br>२.अर्जदाराने अर्जासोबत मतदार ओळखपत्र/ मतदार यादीची प्रत या दोन्हींपैकी एक पुरावा जोडावा.<br><br>३.घटस्फोटित स्रियांचे बाबतीत न्यायालयाच्या आदेशाची प्रत.<br><br>४.विधवा स्रियांचे बाबतीत पतीच्या मृत्यू दाखल्याची प्रत.<br><br>५.वार्षिक उत्पन्न मर्यादा र.रु. २,००,०००/- पर्यंत असल्याबाबत मा.तहसिलदार/ सक्षम प्राधिकारी यांचा उत्पन्नाचा दाखला अथवाप्राधान्य घरगुती शिधापत्रिका(PriorityHousehold Ration Card आवश्यक)<br><br>६.महानगरपालिकेच्या कौशल्य प्रशिक्षण योजने अंर्तगत प्रशिक्षण घेतले असल्यास प्रमाणपत्राची सत्यपत्र अर्जा सोबत जोडावी<br><br>**७.अर्जदार महिलेचे वय अर्ज केलेल्या दिनांकास ५० वर्षा पर्यंत असावे.**<br><br>८.मनपाच्याकौशल्य प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षणपुर्ण केले असल्यास र.रु २५,०००/-अर्थसहाय्य आणि प्रशिक्षण घेतले नसल्यास र.रु १५,०००/- अर्थसहाय्यदेय राहील. | १.अर्जदाराने अर्जासोबत पिं.चिं.मनपा हद्दीमधील आधारकार्ड जोडणे आवश्यक.<br><br>२.अर्जदाराने अर्जासोबत मतदार ओळखपत्र / मतदार यादीची प्रत या दोन्हींपैकी एक पुरावा जोडावा.<br><br>३.घटस्फोटित स्रियांचे बाबतीत न्यायालयाच्या आदेशाची प्रत.<br><br>४.विधवा स्रियांचे बाबतीत पतीच्या मृत्यू दाखल्याची प्रत.<br><br>५.वार्षिक उत्पन्न मर्यादा र.रु.२,००,०००/- पर्यंत असल्याबाबत मा.तहसिलदार/ सक्षम प्राधिकारी यांचा उत्पन्नाचा दाखला अथवा प्राधान्य घरगुती शिधापत्रिका (Priority Household Ration Card आवश्यक)<br><br>६.महानगरपालिकेच्या कौशल्य प्रशिक्षण योजने अंर्तगत प्रशिक्षण घेतले असल्यास प्रमाणपत्राची<br><br>सत्यपत्र अर्जा सोबत जोडावी<br><br>**७.सदरची अट रद्द**<br><br>८.मनपाच्या कौशल्य प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षणपुर्ण केलेअसल्या सर.रु.२५,०००/-अर्थसहाय्य आणि प्रशिक्षण घेतले नसल्यास र.रु. १५,०००/- अर्थसहाय्यदेय राहील. |

तरी योजना दुरुस्ती करणे व खर्चास मान्यते कामी सदर विषयास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक तरी योजनांमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९५** **विषय क्रमांक – २९५**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. २९५ दिनांक - २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. वैदय/०३/कावि/१२६/२०२३ दि.२१/३/२०२३ अन्वये, राज्यातील शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांतील वैद्यकीय पदविका/ पदव्युत्तर (NEET PG/DNB) अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी महानगरपालिकेच्या सेवेतील ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांना परवानगीकामी धोरण निश्चितीबाबत. |
| **ठराव क्र. २९५ दिनांक - २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. वैदय/०३/कावि/१२६/२०२३ दि.२१/३/२०२३ अन्वये, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र.मवैअ-२०१९/प्र.क्र.१६५/सेवा-३ दिनांक १९ मार्च २०१९ अन्वये पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रम प्रवेश सुधारित निवड नियमावली प्रसिध्द करणेत आलेली आहे. शासन निर्णय क्रमांकः- एमईडी१०२०/प्र.क्र..९०/२०/शिक्षण-२ दिनांक २६/९/२०२२ अन्वये राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी शासनाच्या सेवेतील वैद्यकीय अधिकारी (सेवांतर्गत उमेदवार) यांच्यासाठी आरक्षण विहीत करणेत आलेले आहेत्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील सेवांतर्गत ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांना राज्यातील शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये (NEET PG / DNB) पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्याक्रमांच्या प्रवेशांकरिता धोरण निश्चित करणे व स्थायी आस्थापनेवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी अभिनामाचे भरलेल्या पदापैकी प्रतिवर्षी ५% पदसंख्येस (NEET PG / DNB) पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्याक्रमासाठी परवानगी देणेची बाब ही धोरणात्मक असल्याने मा. महापालिका सभा तथा प्रशासक यांची मान्यता घेणे.<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी अभिनामाची १६ पदे मंजुर आहेत. व वैद्यकीय अधिकारी अभिनामाची ८२ पदे मंजुर असुन ६५ पदे भरलेली आहेत. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र.मवैअ-२०१९/प्र.क्र.१६५/सेवा-३ दिनांक १९ मार्च २०१९ अन्वये पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रम प्रवेश सुधारित निवड नियमावली प्रसिध्द करणेत आलेली आहे. शासन निर्णय क्रमांकः- एमईडी१०२०/प्र.क्र..९०/२०/शिक्षण-२ दिनांक २६/९/२०२२ अन्वये राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील |

| | |
|---|---|
| | वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी शासनाच्या सेवेतील वैद्यकीय अधिकारी (सेवांतर्गत उमेदवार) यांच्यासाठी आरक्षण विहीत करणेत आलेले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील सेवांतर्गत ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांना राज्यातील शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये (NEET PG / DNB) पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्याक्रमांच्या प्रवेशांकरिता धोरण निश्चित करणे व स्थायी आस्थापनेवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी अभिनामाचे भरलेल्या पदापैंकी प्रतिवर्षी ५% पदसंख्येस (NEET PG / DNB) पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्याक्रमासाठी परवानगी देणेची बाब ही धोरणात्मक असल्याने मा. महापालिका सभा तथा प्रशासक यांची खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देणे आवश्यक आहे.<br>१. NEET PG / DNB प्रवेश परीक्षेस बसण्याकरिता मा.आयुक्त यांची लेखी पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे. पूर्वपरवानगी न घेता थेट अर्ज करणाऱ्या सेवांतर्गत ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी कार्यमुक्त केले जाणार नाही.<br>२. NEET PG / DNB प्रवेश परीक्षेस बसण्यास परवानगी मागणाऱ्या आस्थापनेवरील ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती नियमित झालेली असावी.<br>३. नियमित पदस्थापनेद्वारे नियुक्त वैद्यकीय अधिकारी यांची सेवाच केवळ विचारात घेण्यत येईल. प्रतिनियुक्ती अथवा अतिरिक्त कार्याभाराद्वारे होणारी पदस्थापना विभारात घेण्यात येणार नाही.<br>४. अर्जाच्या दिनांकास परिविक्षाधीन कालावधी वगळून नियमित स्वरुपात किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेली असावी. तसेच (NEET PG / DNB) पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्याक्रमासाठी प्रतिवर्षी ५% पदसंख्येपेक्षा जास्त वैद्यकीय अधिकारी पात्र झाले तर अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्याक्रमासाठी परवानगी देणेत येईल.<br>५. उपरोक्त नमूद सेवेची गणना करताना सदर कालावधी हा थेट रुग्णसेवेशी संबंधित असला पाहिजे आणि प्रशासकीय पदावरील सेवा उपरोक्त ३ वर्षांच्या कालावधीतून वगळण्यात येईल.<br>६. सदर सेवेची गणना करताना अनुज्ञेय असलेली आणि मंजूर करण्यात आलेली रजा वगळता अनुपस्थितीचा कालावधी ग्राह्य धरण्यात येणार नाही.<br>७. परिविक्षाधीन कालावधी प्रवेश परीक्षेच्या दिनांकापर्यंत समाधानकारकरित्या समाप्त करण्यात आलेला असावा.<br>८. ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी तांत्रिक कारणामुळे समाप्त केल्याबाबतचे सामान्य प्रशासन विभागाचे औपचारिक आदेश निर्गमित करण्यात आले नाहीत, परंतु त्यांची ३ वर्षांची समाधानकारक सेवा झाली आहे, अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांना ते परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटींची पूर्तता करीत असतील तरच त्यांना प्रवेश परीक्षेला बसण्यास मा.विभागप्रमुख, वैद्यकीय विभाग यांचेमार्फत परवानगी देण्यात येईल. |

| | |
|---|---|
| | ९. ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी आदेशित झाल्यास, प्रलंबित असल्यास तसेच अन्य करणाच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी किंवा फौजदारी प्रकरण प्रलंबित/सुरु असल्यास त्याला NEET PG/DNB प्रवेश परीक्षेला बसण्यास अपात्र समजण्यात येईल.<br>१०. पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे अनुज्ञेय शुल्क हे संबंधित ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांस भरावे लागेल.<br>११. ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण सेवा ५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झाली असेल अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांना ते त्यांच्या सेवाज्येष्ठता व गुणवत्तेनुसार या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी पात्र ठरल्यास त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा)नियम १९८१ मधील तरतुदीनुसार अध्ययन रजा मंजूर करणेत येईल.<br>१२. जे कर्मचारी अध्ययन रजा संपल्यानंतर कामावर परत येणे अपेक्षित असेल अशा तारखेपासून तीन वर्षाच्या आत सेवानिवृत्त होणार असेल किंवा जो सेवानिवृत्त होण्याचा विकल्प देऊ शकेल, अशा शासकीय कर्मचा-यास अध्ययन रजा मंजूर केली जाणार नाही. तसेच शासकीय कर्मचारी अध्ययन रजेच्या कालावधीनंतर कामावर परत न येता किंवा कामावर परत आल्यानंतर तीन वर्षाच्या कालावधीत सेवानिवृत्त झाला किंवा अन्यथा तो सेवा सोडून गेल्यास रजावेतन, अध्ययन भत्ता, फी, प्रवास यावर शासनाने केलेला खर्च, कोणताही इतर खर्च, याची प्रत्यक्ष रक्कम आणि विदेशी शासन, प्रतिष्ठाने आणि विश्वस्त मंडळे यांसारख्या इतर संस्थानी केलेल्या खर्चाची, असल्यास प्रत्यक्ष रक्कम आणि शासकीय कर्जावर त्या त्या वेळी अमलात असलेल्या व्याजाच्या दराने त्या रकमांवरील मागणी केल्याच्या तारखेपासूनच्या व्याजाची रक्कम शासकीय कर्मचा-याला त्याचा राजीनामा स्वीकारण्यात येण्यापूर्वी किंवा त्याला सेवानिवृत्त होण्याची परवानगी देण्यात येण्यापूर्वी किंवा अन्यथा तो सेवा सोडून जाण्यापूर्वी शासनास/महानगरपालिकेस परत करावी लागेल.<br>१३. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी पदव्युत्तर पदविका / पदव्युत्तर पदवी पूर्ण झाल्यावर वैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची किमान ५ वर्षे सेवा करतील असे बंधपत्र (हमीपत्र) अभ्याक्रमासाठी रुजू होण्यासाठी मा.विभागप्रमुख यांचेकडे भरून देणे आवश्यक आहे.<br>१४. बंधपत्रातील अटी न पाळल्यास सदर वैद्यकीय अधिकारी यांनी रु.५०,००.०००/- (रक्कम रु.पन्नास लक्ष) एवढी किंवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने वेळोवेळी विहित करेल एवढी बंधपत्राची रक्कम दंड म्हणून मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे जमा करावी लागेल.<br>१५. पदव्युत्तर अभ्यासक्रमाची टर्म पूर्ण होऊन परीक्षेला बसलेल्या उमेदवारांना परीक्षा संपताच पुन्हा वैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे रुजू होणे बंधनकारक आहे.<br>१६. पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पद्स्थापनेबाबतची कार्यवाही ही मा.विभागप्रमुख यांचेमार्फत वैद्यकीय विभागाच्या गरजेनुसार करण्यात येईल.<br>१७. संबंधित उमेदवारांना विशिष्ट ठिकाणी नियुक्ती देण्याची मागणी करता येणार नाही. |

| | |
|---|---|
| | १८. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अभ्यासक्रमाकरिता रुजू होऊन अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास/अभ्यासक्रम मध्येच सोडून दिल्यास प्रतिनियुक्ती कालावधीत त्यांना देण्यात आलेले वेतन व भत्ते त्यांचेकडून वसूल करण्यात येतील.<br>१९. त्याशिवाय MCI/NMC च्या नियम आणि अटी शर्तीनुसार दंडाची रक्कमदेखील त्यांना भरावी लागेल.<br>२०. तसेच सदरहू वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नोंदणीसाठी भविष्यात कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.<br>२१. वरील नियमातील कोणत्याही नियमाच्या तरतुदीबद्दल वाद निर्माण झाल्यास / अर्थाबद्दल शंका उपस्थित करण्यात आल्यास यासंबंधी मा.विभागप्रमुख, वैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील स्पष्टीकरण अंतिम राहील व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.<br>२२. वरील नमूद नियम व धोरण यामध्ये कोणत्याही वेळेस पूर्वसूचना न देता बदल/सुधारणा करण्याचे अधिकार मा.विभागप्रमुख, वैद्यकीय विभाग यांचे शिफारसीनुसार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील.<br>२३. सदर नियमावली सन २०२२-२३ या शैक्षणीक वर्षापासून द्यावयाच्या प्रवेश परीक्षेपासून लागू राहतील.<br>महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र.मवैअ-२०१९/प्र.क्र.१६५/सेवा-३ दिनांक १९ मार्च २०१९ अन्वये पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रम प्रवेश सुधारित निवड नियमावली प्रसिध्द करणेत आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक:- एमईडी१०२०/प्र.क्र..९०/२०/शिक्षण-२ दिनांक २६/९/२०२२ अन्वये राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी शासनाच्या सेवेतील वैद्यकीय अधिकारी (सेवांतर्गत उमेदवार) यांच्यासाठी आरक्षण विहीत करणेत आलेले आहे त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील सेवांतर्गत ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांना राज्यातील शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये (NEET PG / DNB) पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्याक्रमांच्या प्रवेशांकरिता धोरण निश्चित करणे व स्थायी आस्थापनेवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी अभिनामाचे भरलेल्या पदापैंकी प्रतिवर्षी ५% पदसंख्येस (NEET PG / DNB) पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्याक्रमासाठी परवानगी देणेची बाब ही धोरणात्मक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती** |

| | |
|---|---|
| | **आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९६** **विषय क्रमांक – २९६**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. २९६ दिनांक - २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. विमुका/5/कावि/123/2023 दि.20/03/2023 अन्वये, JnNURM BSUP शहर झोपडपट्टी पुर्नवसन अंतर्गत लिंकरोड पत्राशेड पॅकेज क्र. ७ अ मधील इमारतींची स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, जलनि:सारण कामांची दुरूस्तीची कामे करणे. (नि.नो.क्र. ८१-६-२०२०-२१) कामांतर्गत होणाऱ्या वाढीव खर्चास व सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. २९६ दिनांक - २१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. विमुका/5/कावि/123/2023 दि.20/03/2023 अन्वये, विषयांकीत कामांतर्गत लिंक रोड येथील A,B,C ह्या ३ इमारती पैकी केवळ B व C ह्या इमारतीच्या विद्युत विषयक कामाचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केलेला आहे. सदर इमारतीपैकी B व C ह्या दोन इमारती करीता ८ पॅसेंजर लिफ्टचा तसेच B व C ह्या दोन इमारतींचे वीज मिटरचा समावेश होता, A इमारतीचे ११२ वीजमीटर व १ कॉमन वीजमिटर सदर चालू कामातून बसविणे आवश्यक असल्याने तसेच A इमारती करीता मे. बी.जी. शिर्के यांनी १३ पॅसेंजरची स्ट्रेचर लिफ्ट बसविली आहे. तसेच लिफ्टच्या गाळ्याच्या साइज नुसार B व C ह्या दोन इमारती करीता ८ पॅसेंजर ऐवजी १३ पॅसेंजरची स्ट्रेचर लिफ्ट बसविणे आवश्यक असलेने ते काम जादा बाब दर मंजूर करून करण्यात आले आहे. तसेच जीएसटी दरामध्ये सहा टक्के वाढ झालेली आहे त्या मुळे व काही बाबींचे परिमाण वाढल्याने एकुण खर्चात वाढ झालेली आहे. त्यामुळे सदर कामाचे विद्युत विषयक कामामध्ये एकुण खर्चात निविदा रक्कमेपेक्षा र.रू. ३२,६४,३२७ + GST इतकी वाढ झालेली आहे.<br><br>सदर कामास मुळ प्रशासकीय मान्यता र.रू. ५,००,००,०००/- इतकी असुन सदर कामाचे पुर्णत्वा अंती स्थापत्य व विद्युत चा एकत्रित एकुण खर्च र.रू. ५,३०,११,४८३ + GST इतका होणार आहे. सदरचा खर्च हा मुळ प्रशासकिय मान्यता रक्कमेपेक्षा अधिक असल्याने मा. महापालिका सभेची सुधारीत प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे.<br><br>सदरचे कामकाज पुर्ण केल्याशिवाय गाळेधारकांना गाळे ताब्यात देता येणार नाहीत. सदर गाळे धारकांचा कामकाज पुर्ण करून गाळे ताब्यात देणेबाबत सतत पाठपुरावा करणेत येत आहे. तरी सदर कामाची सुधारीत प्रशासकिय मान्यता र.रू. ६,००,००,०००/- इतकी करून निविदा रक्कमे पेक्षा अधिक होणाऱ्या र.रू. ३२,६४,३२७ + GST चे खर्चास |

| | |
|---|---|
| | मा. महापालिका सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे.<br><br>सबब सुधारीत प्रशासकिय मान्यता र.रू. ६,००,००,०००/- व निविदा रक्कमे पेक्षा अधिक होणाऱ्या र.रू. ३२,६४,३२७ + GST चे खर्चास मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९७** **विषय क्रमांक – २९७**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. २९७<br>दिनांक -<br>२१/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२९६/२०२३ दि.२१/०३/२०२३ अन्वये, सांगवी फाटा येथील ढोरे पाटील सबवे ते परीहार चौक जवळील नदीवर पुल बांधणे व पोहच रस्ता करणे या कामासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| | |

**ठराव क्र. २९७**
**दिनांक -**
**२१/०३/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२९६/२०२३ दि.२१/०३/२०२३ अन्वये, सांगवी फाट्या जवळील अस्तित्वातील ८.० मी.रूंदीच्या पुलाला समांतर वाढीव २२.०० मी.रूंदीचा पुल बांधणेसाठी पुणे मनपास र.रू.९.०९ + १०.९६ = २०.०५ कोटी अदा करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.७६३० दि.२१/१०/२०२० अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार एकुण र.रु. १६.६५ कोटी पुणे मनपास अदा करणेत आलेले आहे. सद्यस्थितीत सदर पुलाचे १००%काम पुर्ण झालेले असुन सदर पुलाच्या कामामध्ये Escalation वVariationझाल्याने पुणे महानगरपालिकेमार्फत संदर्भ क्र. ८ अन्वये पुलाशेजारी नविन पुल बांधणेसाठीचा खर्च र.रु.९.९७ कोटी व पिंपरी चिंचवड बाजुचा अप्रोज रस्ता कल्व्हर्ट व कम्पाऊंड वॉलचा एकुण खर्च र.रु. १०.९६ कोटी असे एकुण र.रु. २०.९३ कोटी अशा सुधारित रक्कमेची मागणी केलेली आहे. तथापि सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.५५३ दि.०४/०६/२०२० अन्वये र.रु.२०.०० कोटी इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रशासकीय मान्यता घेणेत आली होती. तरी सदर कामास अतिरिक्त खर्च झालेला असल्यामुळे त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

| क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | प्रशासकीय मान्यता र.रु. | सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | सांगवी फाटा येथील ढोरे पाटील सबवे ते परीहार चौक जवळील नदीवर पुल बांधणे व पोहच रस्ता करणे. | २०,००,००,००० | २०,००,००,०००<br><br>(मा.महापालिका सभा ठराव क्र.५५३ दि.०४/०६/२०२०) | २५,००,००,००० |

तरी वरील इतर विशेष योजना व शहर विकास आराखडा अंतर्गत 'सांगवी फाटा येथील ढोरे पाटील सबवे ते परिहार चौक जवळील नदीवर पुल बांधणे व पोहच रस्ता करणे' या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२९८** **विषय क्रमांक – २९८**

**दिनांक- २१/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

**विषय क्र. २९८**
**दिनांक -**
**२१/०३/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. स्था/प्रकल्प/२९५/२०२३ दि.२१/३/२०२३ अन्वये, मुंबई-पुणे रस्त्यावर दापोडी येथे मुळा नदीवर अस्तित्वातील हॅरीस पुलास समांतर नविन पुल बांधणेकामी पुणे मनपा हिश्श्याची रक्कम अदा करणे व वाढ/घट करणेबाबत.

**ठराव क्र. २९८**
**दिनांक -**
**२१/०३/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. स्था/प्रकल्प/२९५/२०२३ दि.२१/३/२०२३ अन्वये, मुंबई-पुणे रस्त्यावर दापोडी येथे मुळा नदीवर अस्तित्वातील हॅरीस पुलास समांतर नविन पुल बांधणेचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यामानाने करणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा मार्फत पुर्वगणनपत्रकामध्ये संपुर्ण कामाचे र.रु.२४.७५कोटीचे पुर्वगणनपत्रक तयार करणेत आलेले आहे. पुलाशेजारी नवीन पुल बांधणेसाठीचा खर्च २४.७५ कोटी यापैकी ५०%खर्च दोन्ही महानगरपालिकांनी देण्याचे ठरले होते. त्यानुसार ५०% र.रु.१२.३७ कोटी रुपयाची मागणी पुणे मनपाकडे करणेत आलेली होती.

त्यानुसार पुणे मनपाने एकुण र.रु.१२.१८ कोटी इतकी रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस अदा केलेली आहे.

मुंबई-पुणे रस्त्यावर दापोडी येथे मुळा नदीवर अस्तित्वातील हॅरीस पुलास समांतर नविन पुल बांधणेचे काम पुर्ण झालेले असुन सदर कामावर प्रत्यक्षात र.रु.२३.०६ कोटी इतका एकुण खर्च झालेला आहे. तथापि सदर कामावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% हिश्यानुसार सुमारे र.रु.११.५३ कोटी इतकी रक्कम होत असुन पुणे मनपामार्फत र.रु.१२.१७ कोटी मनपाकडे अदा करणेत आलेली आहे.

पुणे मनपाने अदा केलेली र.रु.६५ लाख इतकी जादा रक्कम परत मिळणेकामी मा.मुख्य अभियंता(प्रकल्प) पुणे मनपा यांनी त्यांचेकडील पत्र क्र.४१६५ दि.१६/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि सदरचे काम दि.३१/०५/२०१९ रोजी पुर्ण झालेले असल्याने सदर कामाचा सन २०२२-२३ चा सुधारीत अंदाजपत्रकात समावेश करणेत आलेला नाही. त्यामुळे सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात नव्याने नाव समाविष्ट करुन, त्यास सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता तरतुद वर्ग करणेचा खालील प्रस्ताव मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

| क्र | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखा शिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२२-२३ चा सुधारीत तरतुद | वाढ र.रु. | घट र.रु. | सन २०२२-२३ चा सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रावेत संत तुकाराम महाराज पुल ते मुकाई चौकापर्यंतचा रस्त्याचा कडेला पदपथ व सायकल ट्रॅक तयार करणे.(222301044) | ५२ | १७७ | विशेष योजना (वाहतुक सुधारणा) | ३०.०० कोटी | ४०.०० लाख | ० | ३३.०० लाख | ७.०० लाख |
| २ | काळेवाडी फाटा ते एम.एम. शाळे पर्यंतच्या बीआरटी मार्गावरील फुटपाथ व सायकल ट्रॅक अत्याधुनिक पध्दतीने विकसित करणे. (222300882) | ७१ | २२ | विशेष योजना (वाहतुक सुधारणा) | २७.०० कोटी | ५.२२ कोटी | ० | ७५.०० लाख | ४.४७ कोटी |
| ३ | एम्पायर इस्टेट उड्डाणपुलास चिंचवड बाजुकडे उतरणेस व चढणेस लूप/रॅम्प बांधणे (222300882) | ७४ | ०३ | विशेष योजना (फ्लाय ओव्हर ग्रेडसेपरेटर) | ४०.०० कोटी | २.७९ कोटी | ० | २५.०० लाख | २.५४ कोटी |
| ४ | सांगवी फाटा येथील ढोरे पाटील सबवे ते परीहार चौक जवळील नदीवर पुल बांधणे व पोहच रस्ता करणे. (222300015) | ७४ | १८ | विशेष योजना (वाहतुक सुधारणा) | २०.०० कोटी | ६.४० कोटी | ० | २.१२ कोटी | ४.२८ कोटी |
| ५ | बालेवाडी सर्वे नं.४६/४७ जवळ मुळा नदीवर पुल बांधणे व उर्वरीत कामे करणे | नविन काम | | विशेष योजना (वाहतुक सुधारणा) | २०.०० कोटी | ० | २.८० कोटी | - | २.८० कोटी |
| ६ | मुंबई-पुणे रस्त्यावर दापोडी येथे मुळा नदीवर अस्तित्वातील हॅरीस पुलास समांतर नविन पुल बांधणे | नविन काम | | विशेष योजना (वाहतुक सुधारणा) | २०.०० कोटी | ० | ६५.०० लाख | - | ६५.०० लाख |
| | **एकुण** | | | | **१५७.०० कोटी** | **१४.८१ कोटी** | **३.४५ कोटी** | **३.४५ कोटी** | **१४.८१ कोटी** |

वरील प्रमाणे वाढ/घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदरची जादा र.रु.६५ लाख इतकी रक्कम पुलाचे बांधकामापोटी पुणे मनपास अदा करावयाचा व उपरोक्त तक्यामधील नमुद कामांसाठी सन २०२२-२३ च्या सुधारीत अंदाजपत्रकात नव्याने कामाचा समावेश करुन आवश्यक तरतुद वाढ/घट करणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णयः** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**